-: प्रेस नोट :- दिनांक ५/८/२०२६

**शस्त्राचा धाक दाखवुन जीवे ठार मारण्याची धमकी देवून रु.२५ लाख खंडणी वसुल करणा-या झुल्फीकार बेहलीम व त्याच्या इतर साथीदारांविरोधात मोक्का कायदया अतंर्गत कारवाई**

गुन्हे शाखा, युनिट ९, बांद्रा पश्चिम, मुंबई गुन्हा नोंद क्र.९२/२०२६ (बांद्रा पोलीस ठाणे गु.र. क्र.१५५५/२०२६) कलम ३०८(५), ३५१(३), ६१(२), ३(५) सह ३, २५ शस्त्र अधिनियम अन्वये कुख्यात गुंड झुल्फीकार बेहलीम, त्याचा भाउ मोहसीन बेहलीम व त्यांचे इतर १० साथीदार, अशा १२ आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

या गुन्हयाचा तपास युनिट ९, गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडून करण्यात येत असताना या गुन्हयातील अटक आरोपी सराईत गुंडप्रवृत्तीचे असल्याचे व त्यांची गुन्हेगारी टोळी असल्याचे निष्पन्न झाले. या आरोपींनी या सदर गुन्हयाच्या माध्यमातून संघटीत गुन्हेगारी टोळीची दहशत पसरुन टोळी प्रमुख झुल्फीकार यासीन बेहलीम याने स्थानिक परिसरातील व्यावसायिकांमध्ये दबदबा ठेवणे व कंत्राट घेणा-या कंत्राटदारांमध्ये दहशत पसरवून, त्यांच्याकडून प्रत्येक कंत्राटाच्या मागे खंडणीची रक्कम प्रोटेक्शन मनीच्या स्वरुपात पैसे मिळविणे तसेच संघटीत गुन्हेगारी टोळीचा आर्थिक फायदा करण्यासाठी केला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

त्यामूळे, दिनांक ०४/०८/२०२६ रोजी, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई यांच्या पुर्वपरवानगीने या गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम २३(१) अन्वये कलम ३(१)(ii), ३(२),३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.